# संसदेतील राजकीय पक्ष संदर्भातील बदल व परिणाम

**प्रा.डॉ.एस.जी. भांगडीया,**

कला **महाविद्यालय, बडनेरा (रे) (राज्यशास्त्र विभाग प्रमुख)**

**सारांश :-**लोकशाही शासनपध्दतीमध्ये राजकीय पक्षाचे महत्व अनन्य साधारण आहे. राजकीय पक्षाशिवाय लोकशाहीची कल्पनाच करता येत नाही. म्हणुनच लोकशाही व राजकीय पक्ष हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हणतात. भारतीय संविधानाने बहुपक्ष पध्दतीचा स्विकार केला. सांसदिय शासनपध्दती असणाऱ्या ब्रिटनमध्ये मात्र द्विपक्ष पध्दती आहे. भारतातील राजकारणावर अनेक पक्षांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. भारतीय समाजात विविधता असल्याने बहुपक्ष पध्दती अस्तित्वात येणे स्वाभाविकच मानावे लागेल. परंतू या बहुपक्ष पध्दतीचा काही सकारात्मक तर काही नकारात्मक प्रभाव दिसून येतो.निश्चितपणे असे म्हणता येईल की अनेक छोट्या-छोट्या पक्षांच्या निर्मितीमूळे लोकांच्या राजकीय सहभागाला अधिक चालना मिळाली. तसेच स्त्रियांच्या राजकीय सहभागातही वाढ झाली विभिन्न जाती समुहांना संसदेत प्रतिनिधीत्व मिळाले. ग्रामीण भागातील प्रतिनिधीत्वातही वाढ झाली. असे काही सकारात्मक प्रभाव संसदेत अभ्यासायला मिळाले. तसेच पक्षवाढीचा परिणाम संसदेच्या कामकाजावर दिसून येतो. प्रादेशिक वाद, भ्रष्टाचार, राजकीय अस्थैर्य या सारखे परिणाम ही दिसून येतात. यासर्व घटकांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या शोध निबंधात केला आहे.

लोकशाहीतील सत्ताप्राप्तीच्या स्पर्धेत राजकीय पक्षांची भूमिका महत्वपूर्ण असते. तसेच लोकांना मोठ्या प्रमाणात राजकारणाशी जोडणे व त्यांचा राजकारणातील सक्रिय सहभाग करुन घेण्याचे ही एक मोठे साधन बनले आहे. त्यामुळेच आपल्या देशात असंख्य छोट्या-छोट्या पक्षांचा उदय झालेला दिसतो. ऐतिहासिकदृष्ट्या विचार केल्यास भारतातील राजकीय पक्ष चळवळीमधून आकाराला आले आहेत. लोकांच्या लोकशाही आकांक्षांच्या अभिव्यक्तिच तसेच राष्ट्रवादी जाणिवांना आकार देण्याचे साधन या रुपात त्यांचा विकास झाला आहे. भारतातील काँग्रेस पक्षाने एकाच वेळी एक चळवळ म्हणून व राजकीय पक्ष म्हणून कार्य केले आहे. देशाच्या उभारणीमध्ये महत्वाची भूमिका बजावणाऱ्या राजकीय पक्षांना आपले अस्तित्व टिकविणे आज कठीण जात आहे. त्यामुळे जी पोकळी निर्माण आली आहे त्यातून अनेक नवे पक्ष उदयास आले. तसेच अस्तित्वात असलेल्या पक्षांमध्ये फुट पडून नवीन पक्ष उदयास आल्याचेही दिसून येते. खुल्या राजकीय स्पर्धेच्या सुरुवातीच्या दशकामध्ये बहुतेक विरोधी पक्ष हे काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटींमधुनच निर्माण झाले. त्याचप्रमाणे विरोधी पक्षातही फुट पडून नवीन पक्षात भर पडली. उदा. जनता पक्षात असंख्ये वेळा फुट पडली. कम्युनिस्ट पक्षातून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष निर्माण झाले. फुटीचे कारण नेतृत्व विषयी मतभेद हेच समोर आले. जातीय, भाषीक व प्रादेशिक आधारावर अनेक पक्ष जन्माला आलेले दिसतात. उदा. बसपा, तेलगू देसम पार्टी, आसाम गण परिषद, समाजवादी पार्टी, राष्ट्रीय जनता दल, तृणमुल काँग्रेस, ए.आय.डी.एम.के., झारखंड मुक्ती मोर्चा, महाराष्ट्रात शिवसेना , मनसे, रिपब्लीकन पक्ष या पक्षातूनही अनेक छोटे-छोटे पक्ष पुन्हा निर्माण झाले. अस्तित्वात असलेल्या राजकीय पक्षांचे वारंवार विभाजन आणि नव्या पक्षांच्या उदय यामुळे स्वाभाविकच राजकीय पक्षांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसते. ते पुढील सारणीवरुन अधिक स्पष्ट होईल. **संसदेतील राजकीय पक्ष संदर्भाती बदल**

| निवडणूक वर्ष | निवडणूक लढविलेल्या पक्षांची संख्या | राष्ट्रीय पक्षांची संख्या | संसदेमध्ये प्रतिनिधीतव केलेल्या पक्षांची संख्या |
|---|---|---|---|
| १९५२ | ५५ | ८ | २२ |
| १९५७ | १६ | ४ | १२ |
| १९६२ | २९ | ९ | २० |
| १९६७ | २५ | ८ | १९ |
| १९७१ | ५२ | ८ | २४ |
| १९७७ | ३४ | ५ | १८ |
| १९८० | ३६ | ६ | १७ |
| १९८४ | ३८ | ७ | २१ |
| १९८९ | ११७ | ८ | २४ |
| १९९१ | १४५ | ९ | २४ |
| १९९६ | २०८ | ७ | २८ |
| १९९८ | १७६ | ७ | ३९ |
| १९९९ | १६९ | ७ | ३९ |
| २००४ | २३० | ६ | ४० |
| २००९ | ३७० | ७ | ३७ |

**स्त्रोत : Election Commission of India**

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, लोकसभा निवडणुकीतील राजकीय पक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पहिल्या लोकसभा निवडणूकीत ५५ पक्षांनी निवडणूक लढविली होती तर २००९ च्या निवडणूकीच्या वेळेस तब्बल ३७० पक्ष निवडणुकीच्या रिंगणात होते. १९८४ च्या निवडणूकी पर्यंत पक्षांची संख्या कमी झालेली दिसते. परंतू १९८९ नंतरच्या काळात राजकीय पक्षांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाल्याचे दिसते. त्यानंतरच्या होणाऱ्या निवडणूकीत सातत्याने वाढ होतांना दिसते.त्याचबरोबर भारतीय संसदेमध्ये प्रतिनिधीत्व करणाऱ्या पक्षांच्या संख्येतही बदल होत गेले. पहिल्या संसदेत २२ पक्षांची प्रतिनिधीत्व केले तर २००९ च्या पंधराव्या लोकसभेत ३७ पक्षांनी प्रतिनिधीत्व केले आहे. यावरुन असे म्हणता येईल की, एका राजकीय पक्षाच्या निर्विवाद वर्चस्वापासुन बहुपक्षाकडे भारताच राजकारण चालले आहे. तसेच ही बहुपक्षीस स्पर्धा दोन प्रमुख राजकीय आघाड्यांमध्ये

परावर्तित होत आहे. उदा. युपीए, एन.डी.ए. याही पलीकडे म्हणजे तिसरा, चौथा मोर्चा बांधनी देखील सध्या सुरु आहे. विभिन्न प्रादेशिक पक्षांच्या उदयामुळे राष्ट्रीय राजकारण ढवळून निघाले आहे. प्रारंभीच्या काळात प्रादेशिक पक्षांचा प्रभाव त्यांच्या क्षेत्रापुरताच होता. परंतू हळूहळू या पक्षांची राष्ट्रीय पक्षांनाही आव्हान दिले आहे. गेल्या काही निवडणूकांपासून प्रादेशिक पक्षांची केवळ संख्याच वाढली नाही तर त्यांना मिळणाऱ्या समर्थनातही वाढ होत आहे. राष्ट्रीय पक्षांकडून होणारा अपेक्षा भंग, सत्ता स्पर्धेचे बदललेले स्वरुप, तसेच विविध सामाजिक घटकांना स्वतःच्या अस्तित्वाची झालेली जाणीव व ओळख यातूनच नवीन पक्ष उदयाला चालना मिळाली परिणामतः राष्ट्रीय पक्षांचा प्रभाव क्षीण होण्यामध्ये झाली. १९८४ सालच्या लोकसभा निवडणूकीत सर्व प्रादेशिक पक्षांना एकत्रितपणे ११.२% मते मिळाली होती. तर २००९ सालच्या निवडणूकीत मतांचे प्रमाण २८.४% गेले. (भारतीय संविधान व राजकारण-तुकाराम जाधव) निश्चितच प्रादेशिक पक्षांचा प्रभाव जनसामान्यांवर होत आहे. २००९ च्या निवडणूकीत ४० प्रमुख प्रादेशिक राजकीय पक्ष तर ९८० नोंदणीकृत बिगर मान्यता पक्षांची नोंदणी झालेली होती. (भारतीय संविधान व राजकारण-तुकाराम जाधव) महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने राजकीय पक्षाची नोंदणी करण्यास नोव्हेंबर २००४ पासून सुरुवात केली. आतपर्यंत आयोगाकडे एकूण ३३५ राजकीय पक्षांनी नोंदणी केली आहे. यामध्ये राष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त पक्ष, राज्यस्तरावरील मान्यता प्राप्त पक्ष तसेच नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षांचा समावेश आहे. (लोकराज्य मार्च-एप्रिल-२०१४) संसदेतील राजकीय पक्षात होणाऱ्या या बदलामूळे **१.** लोकांच्या राजकीय सहभागाला अधिक चालना मिळाली. **२.**संसदेच्या कामकाजावर परिणाम दिसून येतो. **३.**पक्षवाढीचा परिणाम ग्रामीण प्रतिनिधित्वावर ही दिसून येतो. **४.**विभिन्न जाती समुहाला प्रतिनिधीत्व मिळाले आहे.**५.**राष्ट्रीय पक्षांचा प्रभाव क्षीण झालेला दिसून येतो. अशी काही गृहीतके डोळ्यासमोर ठेवून उपलब्ध माहितीच्या आधारे विश्लेषणात्मक पध्दतीने "संसदेतील राजकीय पक्षा संदर्भातील बदल व त्याचे परिणाम" या विषयाचे अध्ययन करण्याचे उद्दिष्ट्ये आहे. पक्षवाढीमुळे संसदेच्या कामकाजावर परिणाम झाला का? ग्रामीण प्रतिनिधत्वाला चालना मिळाली का? विभिन्न जाती समूहाला प्रतिनिधीत्व मिळाले काय? स्त्रियांचा लोकसभेतील सहभाग वाढला का? याचा अभ्यास करणे हे उद्दिष्ट्ये आहे. आणि त्यासाठी १९५२ पासून तर २००४ पर्यंत झालेल्या लोकसभेचे वरील घटकाच्या आधारावर प्राप्त माहितीचे विश्लेषणात्मक अध्ययन केले.सीएसडीएसच्या विविध सर्वेक्षणातून स्पष्ट झाले की, प्रादेशिक पक्षांना लोकांचा पाठींबा वाढत्या प्रमाणात मिळतो आहे. राज्यामध्ये शासन चालविण्याबाबत बहुसंख्य लोकांना राष्ट्रीय पक्षाऐवजी प्रादेशिक पक्ष अधिक योग्य वाटतात. छोट्या-छोट्या पक्षाच्या मोठ्या संख्येमुळे पक्ष लोकांच्या अधिकाधिक जवळ येतात. यामधुन लोकांच्या कृतीशिल लोकशाही सहभागास चालना मिळू शकते. (लोकशाही जिंदाबाद - सुहास पळशीकर)

पक्षांची संख्या वाढल्यामुळे संसदेच्या कार्यकालावर व कामकाजावर निश्चितपणे परिणाम जाणवते. ते पुढील सारणीद्वारे अधिक स्पष्ट होईल.

| लोकसभा | कार्यकाळ | अधिवेशनाची संख्या | बैठकांची संख्या | कामाचे तास |
|---|---|---|---|---|
| पहिली | १९५२-५७(६०) | १५ | ६७७ | ३७८४ |
| दुसरी | १९५७-६२(६०) | १६ | ५८१ | ३६५१ |
| तिसरी | १९६२-६७(५९) | १६ | ५७८ | ३७३३ |
| चौथी | १९६७-७०(४६) | १२ | ४६९ | ३०२९ |
| पाचवी | १९७१-७७(७०) | १८ | ६१३ | ४०७२ |
| सहावी | १९७७-७९(३०) | ९ | २६७ | १७५३ |
| सातवी | १९८०-८४(६०) | १५ | ४६४ | ३३२४ |
| आठवी | १९८५-९८(५९) | १४ | ४८५ | ३२२३ |
| नववी | १९८९-९१(१५) | ७ | १०९ | ७५४ |
| दहावी | १९९१-९६(५९) | १६ | ४२३ | २५२७ |
| अकरावी | १९९६-९७(१८) | ६ | १२५ | ८१३ |
| बारावी | १९९८-९९(१३) | ४ | ८८ | ५७५ |
| तेरावी | १९९९-२००४(५३) | १४ | ३५६ | १९४५ |
| चौदावी | २००४-२००९(६०) | १५ | ३३२ | १७३७ |

वरील सारणीद्वारे असे स्पष्ट होते की, नववी लोकसभेपूर्वी संसदेचा कार्यकाल हा पूर्ण होत असे. अपवाद सहावी लोकसभा (संमिश्र सरकार) १९९० नंतरच्या दशकात हा कार्यकाल कमी झाल्याचे आढळते. उदा. नववी अकरावी बारावी लोकसभा या काळात राजकीय अस्थैर्य दिसून येते.

त्याचप्रमाणे १९५२ पासून संसदेच्या प्रत्येक अधिवेशनातील बैठकांचा आणि अधिवेशनातील कामाच्या तासांचा आढावा घेतला तर असे दिसून येते की, आठव्या लोकसभेपर्यंत देशातील संसदेचे कामकाज हे सुरळीतपणे सुरु होते. (अपवाद सहावी लोकसभा) पहिल्या लोकसभेला १५ अधिवेशनात ६७७ बैठका झाल्या व ३७८४ तास संसदेचे कामकाज चालले. त्या तुलनेत चौदावी लोकसभेचे कामकाज १५ अधिवेशनात ३३२ बैठाकात १७३७ तास कामकाज चालले या काळातील संसदेचे चित्र हे लाजीरवाणे होते. १९८९ हे वर्ष भिन्नता दर्शविणारे आहे या वर्षीच्या नवव्या लोकसभेमध्ये केवळ सात वेळा संसदेचे अधिवेशन झाले आणि एकूण १०९ बैठकात ७५४ तास कामकाज चालले तर बारावी लोकसभेत ४ अधिवेशनात ८८ बैठकात केवळ ५७५ तास कामकाज चालले जे की आतापर्यंतचे सर्वात कमी कामकाजाचा काळ आहे. या काळातील लोकसभेचा कार्यकाळही १५ व १३ दिवसाचाच होता. १९८९ सालच्या निवडणुकीनंतर प्रत्येक अधिवेशनातील संसदेच्या बैठकांची संख्या व कामाचे तास कमी झालेले आढळते. याचे कारण शोधल्यास निश्चितपणे ते पक्षवाढीत दिसून येते. १९८९ च्या निवडणूकीपासून पक्षांच्या संख्येत सातत्याने वाढ झाली आहे. त्यामुळे निश्चितपणे त्याचा परिणाम संसदेच्या कामकाजावर झालेला दिसतो. पहिल्या लोकसभेत जवळपास ७२ बील पास झाले तर १५ व्या लोकसभेत केवळ ४० बील पास झाले. १९७६ ला संसदेत एकूण ११८ बील पास झाले जे की आतापर्यंतची सर्वाधिक संख्या आहे. २००४ ला सर्वाधिक कमी म्हणजे केवळ १८ बील पास झाले. आतापर्यंत संसदेत केवळ १४ खाजगी विधेयक पास झाले आहे. यापैकी १९५६ मध्ये ६ बील पास झाले आहे. सध्याच्या संसदेत २६४ खाजगी विधेयक मांडल्या गेली त्यापैकी लोकसभेत १६० विधेयकावर व राज्यसभेत ११ खाजगी विधेयकावर चर्चा झाली (ebay.in)

पक्षवाढीचा परिणाम ग्रामीण प्रतिनिधीत्वावर ही दिसून येते पक्षांची संख्या अधिक झाल्याने लोकांचा सहभागही वाढला आहे. आज बहुतांश नागरिक हे कोणत्या ना कोणत्या पक्षाचे सदस्य आहेत किंवा राजकीय संघटनेशी जुळलेले आहे. अशा पक्षांची किंवा संघटनांची सुरुवातही छोट्या स्वरुपात छोट्या शहरातून, गावातून होतांना दिसते. उदा. कामगार संघटना, शेतकरी संघटना, युवा संघटना इ. त्यामुळे पक्षांच्या वाढत्या प्रमाणात ग्रामीण भागातील प्रतिनिधीत्वामध्येही वाढ झाली हे खालील सारणीतून स्पष्ट होईल.**ग्रामीण भागातील प्रतिनिधीत्व**

| लोकसभा | ग्रामीण भागातील खासदार % | शहरीभागातील खासदार% | लोकसभा | ग्रामीण भागातील खासदार % | शहरीभागातील खासदार% |
|---|---|---|---|---|---|
| पहिली | ४७ | ५३ | सातवी | ६७ | ३३ |
| दुसरी | ४७ | ५३ | आठवी | ६३ | ३७ |
| तिसरी | ५० | ५० | नववी | ६१ | ३९ |
| चौथी | ५३ | ४७ | दहावी | ६१ | ३९ |
| पाचवी | ५५ | ४५ | अकरावी | ६३ | ३७ |
| सहावी | ६३ | ३७ | चौदावी | ६६ | ३४ |

स्त्रोत : Election Commission of India

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, पहिल्या लोकसभेच्या तुलनेत चौदाव्या लोकसभेत ग्रामीण भागातील खासदाराची टक्केवारी अधिक आहे. पहिल्या लोकसभेत ४७% खासदार ग्रामीण भागातील होते. तर १४ व्या लोकसभेत ती संख्या वाढून ६६% झाली आहे. म्हणजेच राजकीय पक्षांच्या संख्येत जशी वाढ होत गेली त्या प्रमाणात ग्रामीण भागातील प्रतिनिधीत्वही वाढत गेले. राजकीय पक्षांची संख्या वाढल्यामुळे विभिन्न जाती समहाच्या प्रतिनिधीत्वातही बदल झालेला दिसतो. विभिन्न राजकीय पक्षांनी विभिन्न जाती समुहाच्या लोकांना राजकारणात सहभागी होण्याची संधी दिली. ते पूढील सारणीतून अधिक स्पष्ट होईल.**विभिन्न जाती समूहाचे प्रतिनिधीत्व**

| लोकसभा | ब्राह्मण (टक्के) | इतर उच्च जातीय (टक्के) | इतर मागास जाती (टक्के) |
|---|---|---|---|
| पहिली | २४ | २५ | १२ |
| दुसरी | २१ | २८ | १४ |
| तिसरी | १९ | ३३ | १३ |
| चौथी | १९ | २९ | १७ |
| पाचवी | २२ | २६ | १६ |
| सहावी | १६ | २८ | २० |
| सातवी | १४ | २७ | १७ |
| आठवी | १६ | ३५ | १४ |
| नववी | १४ | २९ | २२ |
| दहावी | ८ | ३३ | २४ |
| अकरावी | १० | ३२ | २३ |
| चौदावी | १० | २८ | ३० |

स्त्रोत : Election Commission of India

नवे छोटे प्रादेशिक, वांशिक, जातीय पक्ष निर्माण झाल्याने निवडणूकीचे राजकारण बदलत गेले. सामाजिक आधाराच्या निश्चिती मध्ये प्रदेश, धर्म, वंश, जात हे घटक प्रभावी बनल्यामुळे राजकीय पक्ष हे आधार बळकट करु लागले आहे.१९८९ नंतर संसदेतील जाती समुहाच्या अध्ययन घेण्यास संसद अधिक प्रतिनिधीत्व झाल्याचे दिसून येते. ब्राह्मण समुहाच्या टक्केवारी पेक्षा इतर उच्च जाती व इतर मागास जातीच्या प्रतिनिधींची टक्केवारी वाढलेली दिसून येते. आघाड्यांच्या राजकारणाच्या उदयातून एकीकडे राजकीय अस्थिरता वाढलेली असली तरी दूसरीकडे भिन्न भिन्न सामाजिक घटकांना संसदेत राजकीय पक्ष प्रतिनिधीत्व देत आहे. भारतीय स्त्रियांचा राजकारणातील सहभाग हा मुद्दा नेहमीच चर्चेत असतो. पंचायत राज व्यवस्थेत स्त्रीयांना ५०% आरक्षण आहे. त्याप्रमाणे संसदेत व राज्यविधी मंडळातही असावी ही मागणी सातत्याने होत आहे त्यावर संसदेत बील ही मांडल्या गेले. स्त्रियांच्या लोकसंख्येच्या तुलनेत त्यांचा संसदेतील सहभाग नगण्य स्वरुपाचा आहे. परंतू जशी पक्षांची संख्या वाढत गेली त्याचा परिणाम स्त्रीयांच्या राजकीय सहभागावर दिसून येतो. **लोकसभा निवडणुकांमध्ये महिलांचा सहभाग**

| लोकसभा | उमेदवार | निर्वाचित प्रतिनिधी |
|---|---|---|
| १९५२ | - | २२ |
| १९५७ | ४५ | २७ |
| १९६२ | ७० | ३४ |
| १९६७ | ६७ | ३१ |
| १९७१ | ८६ | २२ |
| १९७७ | ७० | १९ |
| १९८० | १४२ | २८ |

| | | |
|---|---|---|
| **१९८४** | **१६४** | **४४** |
| **१९८९** | **१९८** | **२७** |
| **१९९१** | **३२५** | **३९** |
| **१९९६** | **५९९** | **४०** |
| **१९९८** | **२७४** | **४३** |
| **१९९९** | **२८४** | **४९** |
| **२००४** | **३५५** | **४५** |
| **२००९** | **५५६** | **५९** |

स्त्रोत :- Election commission of India

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, लोकसभेतील महिलांचा सहभाग वाढत आहे. १९५२ ला केवळ २२ महिला प्रतिनिधी होत्या तर २००९ ला ५९ महिला प्रतिनिधी आहे. पक्षांच्याद्वारे महिलांनाही उमेदवारी देण्यात सातत्याने वाढ होत आहे. १९८० या निवडणूकीत महिला उमेदवारीच्या संख्येत पुर्वीच्या निवडणूकीच्या तुलनेत दुपटीने वाढ झालेली दिसते. तसेच प्रतिनिधीत्वामध्ये ही वाढ दिसून येते. २००९ च्या निवडणूकीत एकूण ५५६ महिला उमेदवार रिंगणात होत्या. निश्चितपणे ही वाढ पक्षांच्या संख्येत झालेल्या वाढीमुळे आहे.राष्ट्रीय पक्षांनी महिलांना दिलेली उमेदवारी समाधनकारक नाही हे १९९९,२००४ व २००९ च्या निवडणुकीच्या विश्लेषण केल्यास अधिक स्पष्ट होते. **राष्ट्रीय पक्षांचे लोकसभेतील महिला उमेदवार**

| **राष्ट्रीय पक्ष** | **१९९९** | | **२००४** | | **२००९** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **उमेदवार** | **निर्वाचीत प्रतिनिधी** | **उमेदवार** | **निर्वाचीत प्रतिनिधी** | **उमेदवार** | **निर्वाचीत प्रतिनिधी** |
| काँग्रेस | ५१ | १४ | ४५ | १२ | ४३ | २३ |
| भाजप | २५ | १५ | ३० | १० | ४४ | १३ |
| बसपा | ११ | ०१ | २० | ०१ | २८ | ०४ |
| भाकप | ०४ | ०१ | ०२ | | ४ | ० |
| माकप | ०५ | ०३ | ०८ | | ६ | ०१ |
| जेडि(एस) | ०५ | | | | | |
| जेडि(यु) | ०३ | ०१ | | | | |
| राष्ट्रवादी काँग्रेस | | | ०५ | ०२ | ०७ | ०२ |
| राष्ट्रीय ज. दल | | | | | ०२ | ०० |
| **एकूण** | **१०५** | **३५** | **११०** | **३०** | **१३४** | **४३** |

]स्त्रोत : Election Commission of India

१९९९ च्या निवडणूकीत २८४ महिला उमेदवार होत्या. त्यापैकी १०४ महिलांना राष्ट्रीय पक्षांनी उमेदवारी दिली होती. त्यात काँग्रेस पक्ष आघाडीवर होता. तर १०२ महिलांना प्रादेशिक पक्षांनी उमेदवारी दिली तर ७८ महिला स्वतंत्रपणे निवडणूकी लढल्या.२००४ त्या निवडणूकीत ५५६ महिला उमेदवारापैकी १३४ महिला उमेदवार राष्ट्रीय पक्षाच्या होत्या तर ४४२ महिला ह्या प्रादेशिक पक्षाच्या व स्वतंत्र उमेदवार होत्या.यावरुन असे म्हणता येईल की, पक्षाच्या वाढत्या संख्येचा परिणाम महिलांच्या राजकीय सहभागावर झाला.अशाप्रकारे पक्षवाढीचा परिणाम एकंदरीत लोकांच्या राजकीय सहभागावर दिसून येते. राजकीय पक्षांच्या संख्येत झालेली वाढ व लोकांचा राजकीय पक्षाशी असलेला संबंध व सहभाग जवळून अभ्यासल्यास असे दिसून येते की, निवडणूकप्रधान लोकशाही बळकट होत आहे. लोकांचा कृतीशील सहभाग निवडणूकीच्या प्रक्रियेत स्पष्टपणे दिसतो.विविध प्रादेशिक पक्षांचा संदर्भात नेहमी चर्चा सुरु असते की द्विपक्षीय राजकारण असावे प्रादेशिक पक्षामूळे देशाच्या राजकारणात गोंधळ निर्माण होतो. देशात आघाडीचे सरकार चालवावे लागते, सरकारला निर्णय घेण्यात अडचणीचे जाते, भ्रष्टाचाराला ऊत येते, राष्ट्रीयच नाही तर आंतरराष्ट्रीय राजकारणावरही परिणाम होतो, यात संत्याश असेल तरी प्रादेशिक पक्षांमुळे केंद्र सरकारवर वचक राहतो, प्रादेशिक प्रश्न, समस्या प्रादेशिक नेतेच चांगल्या प्रकारे समजू शकतात, त्यामुळे या छोट्या प्रादेशिक पक्षांनाही राजकारणात महत्व आहे गरज आहे प्रादेशिक नेत्यांनी आपल्या महत्वकाक्षांना आवर घालने घटनात्मक नैतिकता टिकवून ठेवणे असे झाले. तर नक्कीच पक्ष जरी संख्येने वाढले तरी ते लोकशाही बळकट करण्यास महत्वाची भूमिका बजावतील.

**-: संदर्भ :-**

१) लोकशाही जिंदाबाद - योगेंद्र यादव, सुहास पळशीकर, पीटर डिसूझा
२) भारतीय संविधान व भारतीय राजकारण - तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर
३) लोकदिप (राजकारण विशेष)(२०१३) - दिवाळी अंक लोकशाही वार्ता
४) लोकराज्य - मार्च - एप्रिल २०१४
५) स्त्री संघर्ष का इतिहास - राधा कुमार